MHAU110003282007

## नियमित दिवाणी मुकदमा क्र. ९१ सन २००८
## निशाणी ९५ वरील आदेश

अर्ज व म्हणणे वाचुन पाहिले. वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे वादपत्रामध्ये दुरुस्ती करणेस परवानगी मिळणेबाबत दाखल केला आहे.

२. अर्जातील वादीचे थोडक्यात कथन असे की, त्यांनी प्रस्तुतचा दावा प्रतिवादींच्याविरुध्द त्यांच्या मौजे लोहगड नांद्रा, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद येथे गट नं.१०४ मधील १३ एकर २८ गुंठे जमीनीवरील १७ गुंठे अतिक्रमित जमीनीचा प्रत्यक्ष ताबा व कायम मनाई हुकूम मिळणेबाबत दाखल केला आहे. सदरचा दावा प्रलंबित असतांना वादी यांनी नि.क्र.७४ वर दिलेला कोर्ट कमिश्नरचा अर्ज न्यायालयाने मंजुर केल्यानंतर वाद मिळकत व प्रतिवादीची जमीन मोजणी करुन त्याचा मोजणी अहवाल व नकाशा न्यायालयात दाखल झाला. सदर मोजणी अहवालानुसार वादीची १० आर जमीन प्रतिवादींनी अतिक्रमीत केल्याचे दिसुन येत आहे. त्यामुळे वादी हे सदर दाव्यात मागणी केल्याप्रमाणे मौजे लोहगड नांद्रा, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद येथील गट नं.१०४ मधील १३ एकर २८ गुंठे जमीनीवरील १७ गुंठे अतिक्रमित जमीन ऐवजी मौजे लोहगड नांद्रा, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद येथे गट नं.१०४ मधील १३ एकर १८ गुंठे जमीनीवरील १० गुंठे अतिक्रमित जमीनीचा प्रत्यक्ष ताबा व कायम मनाई हुकूमणेसाठी अशी त्यांच्या दाव्यामध्ये सुधारणा करु इच्छीतात. त्यामुळे वादींनी सदरचा अर्ज केला आहे.

३. प्रतिवादीने प्रस्तुत अर्जावर आपले लेखी म्हणणे सादर केले आहे. प्रतिवादींनी सदरच्या अर्जास विरोध केला व सांगितले की, वादींनी सदरचा दावा वर्ष २००८ साली दाखल केला असुन तो तत्कालीन दिवाणी न्यायाधीश क. स्तर, फुलंब्री यांनी खारीज केला होता. त्यानंतर सदर न्यायनिर्णयास आव्हान देण्यात येऊन मा. अपीलीय कोर्टाने त्यामध्ये फक्त फेर मोजणीचा आदेश दिला होता. वादींनी सदरचा अर्ज फक्त दाव्यातील पोकळी भरण्यासाठी दाखल केला असुन सदरचा अर्ज मंजुर केल्यास दाव्याच्या मुळ स्वरुपात बदल होत आहे. त्यामुळे सदरचा अर्ज खारीज करण्याची त्यांनी विनंती केली.

४. अर्ज निर्णित करण्यास माझेसमोर खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित झाले. त्याचे निष्कर्ष मी त्याखाली दिलेल्या कारणमिमांसेसह नाेंदविले आहेत.

| अनु क्र. | वादमुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादीने मागणी केलेली प्रस्तावित दुरूस्ती दोन्ही पक्षामधील वाद अंतिमतः निर्णित करण्यास आवश्यक आहे काय? | ..होय |

| | | |
|---|---|---|
| २. | वादींनी मागणी केलेल्या प्रस्तावित दुरूस्तीमुळे दाव्याच्या मुळ स्वरुपामध्ये बदल होतो काय ? | ..नाही |
| ३. | काय आदेश? | ..अर्ज मंजुर करणेत येत आहे. |

## कारणमिमांसा

### मुद्दे क्र.१ ते ३ करीता

५. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ नुसार दोन्ही पक्षामधील खराखुरा वाद अंतिमतः निर्णित करण्यासाठी न्यायालयास, प्रदान केलेल्या विवेकाधिकारानुसार कोणत्याही वेळी आणि त्यास योग्य वाटेल अशा दावा खर्चविषयक अटीवर किंवा अन्यथा, दाव्यातील कोणत्याही कार्यवाहीमधील कोणताही दोष किंवा चुक सुधारता येईल. वादपत्रामध्ये दुरुस्तीस परवानगी देत असताना दाव्याच्या मुळ स्वरुपामध्ये बदल होणार नाही, तसेच प्रस्तावित दुरुस्ती विरुध्द पक्षास त्रासदायक होणार नाही याची दक्षता न्यायालयाने घेणे आवश्यक असते. थोडक्यात दाव्याच्या मुळ स्वरुपामध्ये बदल न करणारी व खराखुरा वाद निर्णित करण्यासाठी आवश्यक असलेल्या दुरुस्तीस परवानगी देणे न्यायसंगत होते.

६. वादीने सदरचा दावा हा प्रतिवादीविरुध्द अतिक्रमित जमीनीचा ताबा मिळणेकामी दाखल केलेला आहे. सदर दावा प्रलंबित असतांना करण्यात आलेली मोजणी लक्षात घेता त्यात दर्शविलेले नेमके अतिक्रमण अभिलेखावर आणणे गरजेचे आहे. वादी यांनी गट नं.१०४ मधील १३ एकर २८ गुंठे जमीनीवरील १७ गुंठे अतिक्रमित जमीनीचा प्रत्यक्ष ताबा मिळणेबाबत दावा दाखल केला आहे. कोर्ट कमिश्नरच्या अहवालात वाद मिळकत वरील १० आर जमीन प्रतिवादी यांनी अतिक्रमित केलेली दाखवत आहे व मुळ दाव्यात वादींनी प्रतिवादींनी त्यांची १७ आर जमीनीवर अतिक्रमण केल्याचे सांगितले आहे. या दोन्ही बाबींमध्ये तफावत दिसुन येत असल्याने वादींनी मातिलेली सदरची दुरूस्ती ही नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने संयुक्तीक वाटत आहे. वादींनी त्यांनी मागणी केलेल्या दुरुस्तीस संयुक्तीक कारण दिलेले आहे. त्यामुळे सध्यस्थितीत दाव्यात दुरुस्तीची परवानगी दिल्याने प्रतिवादींना त्याचा कोणताही नुकसान होणार नाही. करीता, मी मुद्दे क्र.१ व २ चा निष्कर्ष 'होकारार्थी' नोंदवुन मुद्दा क्र.३ च्या उत्तरार्थ खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. वादीला असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ मध्ये दिलेल्या तरतुदीस अधीन राहून वादपत्रामध्ये दुरुस्ती करुन त्याची दुरुस्त प्रत आज पासुन १४ दिवसाचे आत अभिलेखावर सादर करावी.

३. येणेप्रमाणे अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

(व्ही. व्ही. रावजाडेजा),
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, फुलंब्री.

दिनांक :– ११.०१.२०२४